अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | गुरुवार, दि. १७ ऑगस्ट २०२३ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : ३१८ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## आता रेल्वेच्या नव्या सात प्रकल्पांना हिरवा झेंडा

✔ **नवी दिल्ली** : भारतीय रेल्वेच्या सेवांचा विकास आणि प्रवाशांच्या सुविधांमध्ये सुधारणा करण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारने ७ प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. सात रेल्वे प्रकल्पांना हिरवा झेंडा दाखवताना ३२,५०० कोटी रुपये मंजूर करण्यात आल्याचे केंद्रीय रेल्वेमंत्र्यांनी सांगितले. या प्रकल्पांमुळे रेल्वेची मालवाहतूक वाढणार आहे. तर सुमारे ७ कोटी लोकांना रोजगार मिळण्याचा मार्गही मोकळा होणार आहे.

आगामी लोकसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवत केंद्रातील भाजप सरकार नवनवीन प्रकल्प आखत असून, काही प्रकल्पांना मंजुरी देत ते राबविल्या जात आहेत. अशातच आज केंद्रीय मंत्रीमंडळाच्या झालेल्या बैठकीत रेल्वेच्या नव्या सात प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या निर्णयांबाबत माहिती देताना केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले की, बुधवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाने भारतीय रेल्वेच्या ७ मल्टी-ट्रॅकिंग प्रकल्पांसाठी ३२,५०० कोटी रुपयांच्या खर्चास मान्यता दिली आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले की, हे प्रकल्प पूर्णपणे अभियांत्रिकी, खरेदी आणि बांधकाम मोडवर बांधले जातील. या प्रकल्पांद्वारे भारतीय रेल्वेच्या विद्यमान नेटवर्कमध्ये २,३३९ किलोमीटरची वाढ होणार आहे. केंद्रीय मंत्रीमंडळाने मंजुरी दिलेल्या सात नव्या रेल्वेच्या प्रकल्पांमध्ये उत्तर प्रदेश, बिहार, तेलंगणा, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र, गुजरात, ओदिशा, झारखंड आणि पश्चिम बंगाल या ९ राज्यांमधील ३५ जिल्ह्यांचा या प्रकल्पामध्ये समावेश आहे.

# काका चक्रव्युहात, पुतण्या धर्मसंकटात!

## मोदींच्या नव्या खेळीने अजितदादांच्या स्वप्नावर गदा?

✔ सुराज्य/विशेष प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा खा. शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजितदादा यांच्या पुण्यात झालेल्या गुप्त बैठकीतील गुपितं हळू हळू हळू बाहेर पडू लागले आहेत. बंद दाराआड झालेल्या चर्चेत मोठे गोलमाल असल्याचे दिसते. पवारांना भाजपसोबत आणलात तरच आपण मुख्यमंत्री व्हाल, अशी अट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अजितदादांसमोर ठेवल्याचे वृत्त आहे. काँग्रेसने त्याला दुजोराही दिला आहे. आपले राजकीय स्वप्न साकार करण्यासाठीच अजितदादांनी गेल्या आठवड्यात पुण्यात काकांची भेट घेतल्याचे सांगण्यात येते. सीएम पदासाठी अजितदादांनी काकांना भाजपसोबत येण्याची विंनती केल्याचेही सांगण्यात येते. ही न्यूज खरी असेल तर शरदरावांनी आपली राजकीय भूमिका स्पष्ट करावी, असे आवाहन काँग्रेसने दिल्यामुळे शरदराव चक्रव्युहात सापडले आहेत तर मोदींनी शर्थ समोर ठेवल्याने अजितदादा हे धर्मसंकटात अडकले आहेत. त्यामुळे आगामी काळात शरदराव यांच्यासह अजितदादा कोणती राजकीय भूमिका घेणार, याकडे राजकीय पंडितांचे लक्ष लागून आहे.



### राष्ट्रवादीत अंदर-बाहर, सब गोलमाल है, भाई सब गोलमाल !



पंतप्रधान नरेंद्र मोदी हे पुण्याला येवून गेल्यानंतर काही दिवसातच अजितदादांनी पुण्यातच शरदरावांशी गुप्त बैठक घेतली. अखेर बैठकीचे बिंग फुटलेच. प्रसारमाध्यमांना सुगावा लागल्यानंतर अजित पवार यांच्यावर बंगल्यातून बाहेर पडताना कॅमेऱ्यांपासून लपताना तारांबळ उडाली होती. परंतु, मी त्या गाडीतच नव्हतो, असा खुलासा अजित पवार यांनी केला होता.

बैठकीत काय डाळ शिजली याविषयीची राजकीय धुळवड गेल्या आठवडाभरापासून सुरू आहे. काका आणि पुतण्या या दोघांनीही त्याचा अंत लागू दिला नाही पण गुपित आता बाहेर पडू लागले आहे. पवार यांना आपल्यासोबत (भाजप) आणले तरच तुम्हाला मुख्यमंत्रीपद मिळेल, अशी महत्त्वाची अट पंतप्रधान मोदी यांनी अजितदादा यांच्यासमोर ठेवली आहे. त्यामुळेच अजित पवार सातत्याने पवार यांची मनधरणी करत असल्याचा दावा राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. वडेट्टीवार यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना केलेल्या या खळबळजनक वक्तव्याचे सध्या राजकीय वर्तुळात पडसाद उमटत आहेत.

अजितदादांना मुख्यमंत्री व्हायचे आहे. त्यामुळेच ते सातत्याने शरद पवार यांना भेटून त्यांच्याकडे सोबत येण्याची दया-याचना करत आहेत, अशी शक्यता वडेट्टीवार यांनी बोलून दाखवली.वडेट्टीवार यांच्या विधानानंतर पवारांनी त्यावर बुधवारी दिवसभरात तरी कुठलीही प्रतिक्रिया दिलेली नाही हे विशेष.

शरद पवार आणि अजित पवार यांच्या पुण्यातील गुप्त बैठकीमुळे महाराष्ट्रातील राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा तर्कवितर्कांना उधाण आले आहे. या भेटीनंतर शरद पवार यांच्या भूमिकेविषयी काहीप्रमाणात संभ्रमही निर्माण झाला होता. यानंतर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि उद्धव ठाकरे यांच्यात चर्चाही झाली होती. परंतु, वडेट्टीवार यांनी तुर्तास आमच्या मनात शरद पवार यांच्याविषयी संभ्रम नसल्याचे म्हटले. त्यांना आणखी थोडा वेळ द्यायला हवा. अजित पवार यांना शरद पवार यांची गरज आहे. त्यामुळे अजित पवार हे शरद पवार यांना भेटायला जात आहेत. शरद पवारांना भाजपसोबत युती करण्यास राजी करता आले नाही तर अजित पवार यांचे मुख्यमंत्रीपदाचे स्वप्न अपूर्ण राहील, अशी अट भाजपकडून घालण्यात आली असावी. हा सगळा सत्ता टिकवण्यासाठीचा खटाटोप असल्याचे वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

मात्र, अजित पवार यांच्या गटाकडून वडेट्टीवार यांचा हा दावा सपशेल फेटाळून लावण्यात आला आहे. अजितदादा गटाचे प्रवक्ते उमेश पाटील म्हणाले की, वडेट्टीवार यांचे वक्तव्य बालीश आहे. पंतप्रधान मोदींनी अजित पवारांना कोणतीही अट घातलेली नाही. लोकसभा निवडणुकीत विजय मिळवण्यासाठी अजित पवारांसारखा मास लिडर सोबत असावा, असे भाजपला वाटले. अजितदादांमुळे राज्याच्या विकासाला गती मिळू शकेल, या आशेने भाजपने त्यांना सरकारमध्ये सामावून घेतले आहे, असेही पाटील म्हणाले.

### दादाला आमचा वैचारिक विरोध...

आम्ही वैचारिक मतभेद आणि नात्यांमध्ये असलेला ओलावा यात कधीही फरक करत नाही. एन. डी. पाटील यांच्या पत्नी या पवारसाहेबांच्या बहीण आहेत. मात्र तरीही एन. डी. पाटील अनेकदा पवारांच्या विरोधात होते. त्यांचे वैचारिक मतभेद होते. मात्र आमच्या नात्यांमधला ओलावा कधीही कमी झाला नाही. त्याच पद्धतीने अजितदादा आणि पवारसाहेब यांच्यामधील नात्यांत ओलावा हा कुठेही कमी झालेला नाही. मात्र पक्षातील वैचारिकतेवर आम्ही नेहमीच एकमेकांविरोधात असणार आहे, असे राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांनी म्हटले.

### अशी आहे, ऑफर...

अजितदादांनी या गुप्त बैठकीत शरद पवार यांना दोन ऑफर दिल्या. शरद पवार भाजपसोबत आल्यास त्यांना केंद्रात कृषीमंत्रीपद किंवा निती आयोगाचे अध्यक्षपद देण्याची भाजपची तयारी आहे. तसेच जयंत पाटील आणि सुप्रिया सुळे या दोघांनाही अनुक्रमे राज्य आणि केंद्रीय मंत्रिमंडळात सामावून घेतले जाईल, असा प्रस्तावही अजितदादांनी बैठकीत शरद पवार यांच्यासमोर मांडल्याचा गौप्यस्फोट काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केल्याने राजकीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे. मात्र, शरद पवार यांनी हे दोन्ही प्रस्ताव तत्काळ फेटाळून लावले. मी कोणत्याही परिस्थितीत भाजपशी युती करणार नाही, असा स्पष्ट संदेश शरद पवारांनी दिल्याचे सांगण्यात येते.आपण भाजपच्या विरोधात रणनीती आखत आहोत, असे पवार यांनी संभाजीनगर येथे बोलताना सांगितले.

### होय, साकडे घातले आहे...

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एक कुटुंब आहे. कुटुंब एक असल्यामुळे आमचा पक्षही एकच आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी शरद पवार यांची भेट घेऊन त्यांनी सरकार बरोबर यावे यासाठी त्यांना साकडं घातलं आहे, असे राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ हे बुधवारी पुण्यात बोलताना म्हणाले.

## शेतकऱ्याचा आत्मदहनाचा प्रयत्न

### नूतन जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रकार

✔ सुराज्य/सोलापूर

नूतन जिल्हाधिकारी कार्यालयात स्वातंत्र्य दिनाचा सोहळा सुरु असतानाच एका शेतकऱ्याने आत्मदहनाचा प्रयत्न केला. शेतावरील बँकेने सातबारावर लावलेला बोजा कमी करावा या मागणीसाठी हे कृत्य केल्याचे समजते. ज्ञानेश्वर भारत पाटील असे आत्मदहनाचा प्रयत्न करणाऱ्या शेतकऱ्याचे नाव आहे. दक्षिण सोलापूर तालुक्यातील दोड्डी या गावचा रहिवासी आहे. सोलापूर कृषीउत्पन्न बाजार समितीमध्ये अडत व्यापारी देखील असल्यसचे समजते.

१५ ऑगस्ट रोजी सकाळी जिल्हाधिकारी कार्यालयात ध्वजारोहण झाले. त्यानंतर वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांचे भाषण सुरू होते. त्याचवेळेस ज्ञानेश्वर पाटील यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर स्वतःवर डिझेल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केला. अचानक घडलेल्या या घटनेमुळे गोंधळ उडाला. प्रवेशद्वारावर सुरक्षेसाठी तैनात असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्याला रोखत ताब्यात घेतले. पोलिसांनी वेळीच सावध होत शेतकऱ्याला ताब्यात घेतल्याने मोठा अर्नथ टळला.



शेतकरी ज्ञानेश्वर पाटील यांनी ३ वर्षांपूर्वी लोकमंगल सहकारी बँकेकडून ४० लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. टप्याटप्याने त्यांनी या कर्जाची परतफेड देखील केली. कर्जाची परतफेड होऊन देखील सात बारा उताऱ्यावर असलेला बँकेचा बोजा हा अद्याप उतरवलेला नाही. त्यामुळे स्वातंत्र्य दिना दिवशी आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला असल्याचे पाटील यांनी सांगितले. या संदर्भात मी प्रशासनाला अनेक वेळा निवेदन दिले आहे. मात्र त्याची कोणतीही दखल घेण्यात आली नाही. त्यामुळे आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी ते देखील करू देत नाहीत मला जागायच नाही जाऊद्या मला मरायच आहे अशी विनंती तो पालिसांना करत होता. शहर सहाय्यक पोलीस आयुक्त संतोष गायकवाड, सोलापूर ग्रामीण पोलीस उपधिक्षक अमोल भारती यांनी देखील लगेचच धाव घेत शेतकऱ्याला आत्मदहनापासून रोखले. पोलिसांनी ताब्यात घेऊन या शेतकऱ्याला रिक्षाद्वारे सोलापुरातील सदर बाजार पोलीस ठाण्यात आण्यात आले. न्यायालयात हजर केले असता वैयक्तिक जातमुचलक्यावर पाटील यांना जामीन मंजूर केला आहे.



जिल्हाधिकारी कार्यालयात ना. हसन मुश्रीफ यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

(सविस्तर वृत्त पान ३)

### महिला अत्याचार प्रकरणी

## स्वयंघोषित महाराज लोमटे गजाआड

✔ सुराज्य/धाराशिव

दैवी चमत्काराचे दावे करणाऱ्या स्वंयघोषित राष्ट्रसंत लोमटे महाराजाला महिलेवर केलेल्या अत्याचार प्रकरणी येरमाळा पोलिसांनी अटक केली आहे. पंढरपूर येथे सापळा लावून मोठ्या शिताफीने पोलिसांनी लोमटे महाराजाला गजाआड केले आहे. न्यायालयाच्या आदेशावरून पोलिसांनी ही कारवाई केली आहे.

दर्शनासाठी आलेल्या महिलेस खोलीमध्ये बोलावून किळसवाणे कृत्य करून मारहाण करत जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी लोमटे महाराजावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानुसार न्यायालयाच्या आदेशानुसार पोलिसांनी सापळा रचून लोमटे महाराजाला पंढरपूरमधून अटक केली आहे.

दैवी चमत्कारामुळे राज्यभर प्रसिद्ध असणारा कळंब तालुक्यातील मलकापूर येथील एकनाथ लोमटे विरोधात २८ जुलै २०२२ रोजी पीडित भक्त महिलेने दिलेल्या तक्रारीवरून येरमाळा पोलिसात विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. परळी येथील ३५ वर्षीय पीडित महिला मलकापूर येथील स्वयंघोषित राष्ट्रसंत लोमटे महाराज यांच्या दर्शनासाठी मठातील दक्षिण मंडपात गेली होती. महाराजाने महिलेस प्रवचन खोलीमध्ये बोलून घेत महिलेचा विनयभंग केला होता. या घटनेने मंदिर परिसरामध्ये प्रचंड गोंधळ मजला होता. या प्रकारानंतर महाराजाने घटनास्थळावरून पळ काढला. त्याच रात्री एक वाजेच्या सुमारास महिलेच्या तक्रारीवरून महाराजावर विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला, त्यानंतर महाराजाला अटकही झाली होती. नंतर जामीनवर सुटका झाली.



पीडित भाविक महिलेने अत्याचार प्रकरणी न्यायालयात दाद मागितली होती. न्यायालयाच्या आदेशाने पीडित मुलीवर अत्याचार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करत पोलिसांना अटक करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार लोमटे महाराजाला अटक केली गेली आहे.

**विविध पक्षांचे बडे नेते महाराजांचे भक्त**

कळंब तालुक्यातील मलकापूर येथे लोमटे महाराज यांचा मठ आहे. आपल्या दैवी शक्तीने महाराज आजारी व्यक्ती आणि भक्ताला बरे करतात अशी महाराजांची ओळख आहे. महाराजांचा राज्यभर मोठा भक्तवर्ग असून यामध्ये विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांचा समावेश आहे. भक्त महिलेच्या विनयभंग प्रकरणात लोमटे महाराजाला अटक झाल्याने धार्मिक क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आता तुम्हीं मला माझ्यापेक्षा जास्त ओळखायला लागलात !

कल्याण
270-98-125

मुंबई
259-61-128

### अधिक मासाची झाली सांगता

## एक कोटी भाविक श्री विठ्ठलाच्या चरणी नतमस्तक

✔ सुराज्य/पंढरपूर

अधिक महिन्याची मंगळवारी सांगता झाली. यंदाचा धोंडा महिना श्री विठुरायासाठी लाभदायक ठरला. महिनाभरात सुमारे एक कोटी भाविकांनी या सावळ्याच्या चरणी नतमस्तक होवून धन्य धन्य होण्याचा आनंद घेतला. श्री विठ्ठलाच्या पदरात अधिकमासाचे दानही मोठ्या प्रमाणात पडल्याचे सांगण्यात आले.

अधिक मासाच्या शेवटी शेवटी सलगच्या सुट्ट्या आल्याने पंढरपुरातही भाविकांनी गर्दी वाढली. वारकरी संप्रदायात हा महिना अधिकच पवित्र मानला जातो. पुरुषोत्तम मासाचे शेवटचे दोन दिवस शिल्लक असताना सलग सुट्ट्या आल्याने पंढरपूर भाविकांनी गजबजून गेले. यावर्षीचा अधिक महिना हा पंढरपूरच्या इतिहासातील सर्वात जास्त गर्दीचा महिना ठरला असून जवळपास एक कोटींपेक्षा जास्त भाविक या महिन्यात पंढरपूरमध्ये येऊन गेल्याची माहिती समोर आली आहे.

या अधिक मासाच्या शेवटच्या दिवशी देवाच्या दर्शनाची रांग गोपाळपूर पत्राशेडपर्यंत गेली होती. अधिक महिन्याच्या पहिल्या दिवसापासून शेवटच्या दिवसापर्यंत रोज याच पद्धतीने गोपाळपुराच्या पत्राशेडमध्ये दर्शनाची रांग राहिली आहे.

रोज साधारण साडेतीन ते चार लाख भाविक अधिकाची पर्वणी साधण्यासाठी पंढरपुरात येत होते. यातच जोडून सुट्ट्या आल्या तर ही गर्दी पाच लाखांपर्यंत ओलांडत होती. या महिन्यातील दोन्ही एकादशीला आषाढी एकादशीपेक्षा जास्त गर्दी दिसून आली. पंढरपूरला रोज येणारे भाविक पहिल्यांदा चंद्रभागेचे पवित्र स्नान करून सोबत आणलेले दिव्याचे वाण अर्पण करून दर्शनासाठी रांगेत लागत असे. मात्र विठ्ठल मंदिरात रोज सरासरी २५ हजार भाविकांना देवाच्या पायावर तर ४० हजार भाविकांना देवाचे मुखदर्शन घेता येत होते. त्यामुळे उरलेले भाविक नामदेव पायरी आणि मंदिर शिखराच्या दर्शनावर समाधान मानत होते .

**१३ लाख भाविकांनी घेतले देवाचे मुखदर्शन**

गेल्या महिनाभरात एक कोटी पेक्षा जास्त भाविकांनी पंढरपुरात येऊन चंद्रभागेचे पवित्र स्नान केले. यात कित्येक राजकिय नेते , सामाजिक कार्यकर्ते यांनी रोज शेकड्याच्या संख्येने भाविकांना पंढरपूरची वारी घडवत पुण्य मिळवले. या अधिक महिन्यामध्ये जवळपास साडेसात ते आठ लाख भाविकांना देवाच्या पायावर दर्शन घेण्याचे भाग्य लाभले तर १३ लाख भाविकांना देवाचे मुखदर्शन घेता आले . यातील बहुतांश भाविकांनी मात्र नामदेव पायरींचे किंवा विठ्ठल मंदिराच्या कळसाचे दर्शन घेऊन आपला अधिक मास पूर्ण केला .

### व्यापाऱ्यांना लाखोंचा फायदा

या महिनाभरात रोज आषाढी यात्रेसारखी गर्दी राहिल्याने व्यापाऱ्यांना लाखोंचा फायदा झाला असून महिनाभर शहरातील बहुतेक हॉटेल लॉजेस हे ओव्हरपॅक होते. यंदा पावसाने ओढ दिल्याने आषाढी यात्रा कमी भरली होती. त्यामुळे अजूनही पाऊस न झाल्याने अधिक महिन्यात देखील भाविक कमीच येणार अशी अपेक्षा असताना लाखो भाविकांनी अधिकची पर्वणी साधल्याने पंढरपूरच्या उलाढालीत देखील कित्येकपटीची वाढ झाली आहे



स्वातंत्र्य दिनानिमित्तपंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात फुलापासून तिरंगा ध्वजाच्या रंगाची सजावट मनमोहक अशी सुंदर आरास करण्यात आली आहे. विठ्ठल व रुक्मिणी मातेच्या चारखांबी, सोळखांबी, विठ्ठल मंडप, विठ्ठल व रुक्मिणी नामदेव पायरीजवळ व श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज दर्शन मंडप परिसरात राष्ट्रध्वजाच्या रंगाची आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली.